शुक्रवार, दि. २२ एप्रिल, २००५ दैनिक ऐक्य, सातारा

# भांबवलीचा वजराई धबधबा



सातारा : निसर्गाच्या अनामिक ओढीनेच माणूस निसर्गाकडे ओढला जाऊ लागला आहे. निसर्गाने वेढलेल्या सातारा जिल्ह्यातीलच मौजे भांबवलीचा वजराई धबधबा म्हणजे नैसर्गिक सौंदर्याचे लेणं आहे. हिरव्यागर्द वृक्षराजी-मध्ये लपलेला हा धबधबा उन्हाळ्यातही अनुभवायला मिळतो हे याचे वैशिष्ट्य आहे.

सातारा जिल्ह्याला ऐतिहासिक पार्श्वभूमी लाभली आहे. अजिंक्यतारा, पांडवगड, सज्जनगड, वैराटगड, चंदनगड आणि सदाशिव गड या सात किल्ल्यांच्या सुरक्षित तटबंदीत ही सातारा नगरी वसली आहे. याच्या जोडीला शिवसागर जलाशय (कोयना नदी), वासोटा, कण्हेर, उरमोडी धरण, कास तलाव, ठोसेघर धबधबा आणि हा वजराई धबधबा.

भांबवली वजराई धबधबा हे एक सुंदर आणि प्रेक्षणीय स्थळ आहे. त्याठिकाणी जाण्यासाठी अजुनदेखील गाडीची सोय नाही, त्यामुळे शहराच्या अतिसंपर्कापासून दूर राहिल्यामुळे येथील निसर्गसौंदर्य अबाधित राहिले आहे. निरव शांतता, पक्ष्यांचा किलबिलाट, वीणेच्या झंकारासारखा वाऱ्याच्या झुळकेने केलेला आवाज, पाण्याचा खळखळाट असं हे सुंदर मनमोहक ठिकाण. रामदास स्वामींच्या पावन पदस्पर्शाने पवित्र झालेला हा परिसर. स्वामींना हा परिसर आवडल्यामुळे काही काळ येथे ईश्वराने तपश्चर्येसाठी वास्तव्य केले होते. त्यांच्या पायांचे ठसे अजूनही धबधब्याच्या मधोमध आहेत.

भांबवली वजराई धबधब्याचे विलोभनीय दृश्य पाहण्यासाठी साताऱ्याहून थेट कास येथे जाता येते. साताऱ्याहून कासला जाताना मध्येच यवतेश्वर येथे शंकराचे पवित्र असे प्राचीन मंदिर पाहता येते. पुढे पेट्री येथे पेटेबाचे (शंकराचे) मंदिर आहे. पेट्री सोडल्यानंतर गाडी मार्गाने कासकडे जाताना पठाराच्या अलिकडे एक रस्ता फुटलेला आहे. त्या रस्त्याने घाटाई देवीच्या मंदिराकडे जाता येते. यामुळे घाटाई देवीचे दर्शन घेता येते. कास गावाजवळ गेल्यानंतर वजराई धबधब्याकडे जाणारा फाटा फुटतो. सातारा ते कास अंतर २७ किलोमीटर आहे. दुसरा मार्ग म्हणजे सातारा व्हाया महाबळेश्वर ते तापोळा असा आहे. तापोळा येथे आल्यानंतर तेथून लाँचने अथवा नावेने बामणोलीला येता येते. बामणोलीहून एखाद्या वाहनाने अथवा एस.टी. ने कासला येता येते. तांबी पुनर्वसाहत ते भांबवली वजराई धबधबा हा प्रवास पायी करावा लागतो. पुनर्वसाहत तांबी येथून एक किलोमीटर ऊतरून भांबवली या गावातून वाटाड्या घेऊन धबधब्याकडे जाणे सोयीस्कर आहे, कारण पुढचा प्रवास थोडासा जंगलातून आहे: गर्द झाडीत शिरताना वाटाड्या सुलभ व सोयीस्कर मार्गाने धबधब्याकडे घेऊन जातो. भांबवली येथून एक किलोमीटर गेल्यानंतर धबधब्याचे विहंगम दृश्य नजरेत भरतं. धबधब्याचा आवाज आणि झाडाझुडपांचा सहवास यात आपण मंत्रमुग्ध होतो. धबधब्याच्या माथ्यावर वजराई देवीचे मंदिर आहे. या धबधब्याचे आणखी वैशिष्ट्य म्हणजे त्याचे चार टप्पे आहेत. धबधब्यातून चारही ठिकाणी जाण्यासाठी पायवाटा आहेत. मधमाशांची पोळी हे येथील वैशिष्ट्य आहे. येथील जंगलात गवे, रानडुक्कर, मुंगूस, सांबर, वानर, साईळ, भेकरं, ससे, वाघ, अस्वल या रानटी जनावरांसह पोपट, कोकिळा, मैना, सुतार, भारद्वाज आदी पक्षीही पहावयास मिळतात. आंबा, औदुंबर, हिरडा, पिंपळ, आळू, आपटा अशी नाना तऱ्हेची झाडे व औषधी वनस्पती येथे आहेत. वजराई धबधब्याचा परिसर पर्यटनस्थळ म्हणून जाहीर करावा, अशी मागणी रवींद्र मोरे आणि ज्ञानदेव मोरे यांनी केली आहे.